# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २५ मार्च, २०२५ / चैत्र ४, १९४७ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) उप मुख्यमंत्री**<br>**(२) जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री**<br>**(३) जलसंपदा (विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री**<br>**(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २५**

---

### अंधेरी (मुंबई) येथील लोखंडवाला परिसरातील अच्युतराव पटवर्धन रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याबाबत

**(१) * ३१९ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (मुंबई) येथील लोखंडवाला परिसरातील अच्युतराव पटवर्धन रस्त्याच्या काँक्रिटीकरणाच्या काम निकृष्ट दर्जाचे झाले असून, हा रस्ता पुन्हा खोदून नव्याने करावा लागल्याची बाब माहे जानेवारी, २०२४ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्यांच्या कामावर देखरेख ठेवण्यासाठी गुणवत्ता संस्थांची नेमणूक केलेली असतानाही अनेक ठिकाणी या रस्त्यांना तडे गेले असून, अशाच प्रकारचे निकृष्ट काम सांताक्रुझ येथील भार्गव मार्गावरही झाले असून मुंबईतील अनेक ठिकाणी नव्याने बांधण्यात आलेल्या रस्त्यांना तडे गेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईत होत असलेल्या सदोष कामांसाठी ९१ कंत्राटदारांना नाममात्र दंड आकारण्याव्यतिरिक्त कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसून निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या या कंत्राटदारांची नावे काळ्या यादीत समाविष्ट करुन दंडात्मक कार्यवाही करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

अंधेरी पश्चिम येथील लोखंडवाला परिसरातील अच्युतराव पटवर्धन रस्त्याच्या संलग्न पट्ट्याच्या (side strips) ७३५० चौ.मी. क्षेत्रफळाच्या काँक्रिटीकरणाच्या कामापैकी ७५ चौ.मी. पृष्ठभागावर तडे आढळून आले. तडे गेलेल्या भागाचे दोषदायित्व कालावधीमध्ये (Defect Liability Period) असल्याने कंत्रादाराकडून स्वखर्चाने नव्याने काँक्रिटीकरण करून घेण्यात आले.

(२) व (३) सांताक्रूझ (पश्चिम) येथील भार्गव मार्गाच्या ३५०० चौ.मी. इतक्या क्षेत्रफळाच्या काँक्रिटीकरणाच्या कामापैकी ४ चौ.मी. क्षेत्रफळाच्या कामामध्ये तडा गेल्याचे व २४ चौ.मी.क्षेत्रफळाच्या कॉक्रिट पृष्ठभागाची झीज झाल्याचे निदर्शनास आले. यामुळे निविदेतील अटीनुसार कंत्राटदाराकडून दोषयुक्त भाग नव्याने स्वखर्चाने करून घेण्यात आला आहे.

निविदेतील अटी व शर्ती नुसार दोषयुक्त काम तोडून टाकून नव्याने करणे व कामाच्या किंमती इतका दंड आकारण्याची तरतूद आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ४ कंत्राटदारांकडून करण्यात आलेल्या ३ लक्ष २७ हजार ४५० चौ.मी.पैकी १३०५ चौ.मी. क्षेत्रफळाच्या रस्त्याच्या काँक्रिटीकरण कामामध्ये तडे आढळल्याने ही कामे कंत्राटदाराकडून नव्याने करुन घेण्यात आली. या दोषयुक्त कामाच्या दुप्पट म्हणजेच रू.३.३७ कोटी इतका दंड कंत्राटदारास तसेच रू.३.३७ कोटी दंड गुणवत्ता व्यवस्थापन संस्थेस आकारण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नगरपरिषद व नगरपंचायत क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवरील मालमत्ता करावरील शास्ती रद्द करणेबाबत

**(२) * १६० श्री.सत्यजीत तांबे, श्री.सुनिल शिंदे, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियमातील कलम १८९ अ नुसार नगरपरिषदा व नगरपंचायत क्षेत्रातील अनधिकृत बांधकामावर प्रतिवर्षी शास्ती आकारण्याबाबत तरतूद करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ६०० चौरस फुटावरील बांधकामांना ५० टक्के तर १००० चौरस फुटावरील बांधकामांना दुप्पट दराने शास्ती आकारल्यामुळे अशा मालमत्ताधारकांना अवाढव्य व अवाजवी दराने मालमत्ता कराची देयके प्राप्त होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अवाजवी दराच्या मालमत्ता करामुळे मिळकतधारकांनी घरफाळ्याची देयके थकीत ठेवली असून त्यामुळे नगरपरिषद कर्मचारी आणि मालमत्ताधारक यांच्यात वादाचे प्रसंग निर्माण होत असून अनेक बांधकाम प्रकल्पांमध्ये विकासकांनी फसवणूक करून मालमत्ताधारकांना घरे विकलेली असल्यामुळे त्यांना विनाकारण शास्तीचा भुर्दंड सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर शासन निर्णयात सुधारणा करून १००० चौरस फुटापर्यंतची बांधकामे अत्यल्प गटाची असलेल्यांना शास्ती कर माफ करण्यात यावा, अशी मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केलेल्या मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने नगरपरिषदा व नगरपंचायत क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांना आकारण्यात येत असलेली शास्ती रद्द करण्याबाबत कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.
(२) हे खरे नाही.

सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.५३, दि.१०.०८.२०१८ मधील तरतुदीनुसार शासन परिपत्रक दि.२७.०९.२०१८ अन्वये अनधिकृत बांधकामाच्या मालमत्ता करावरील शास्तीची आकारणी निश्चित करण्यात आली असून, त्यानुसार ६०० चौ. फुट निवासी अनधिकृत बांधकामांना कोणतीही शास्ती आकारण्यात आलेली नाही. तर, ६०० ते १००० चौ.फुटापर्यंतच्या निवासी अनधिकृत बांधकामांना प्रती वर्षी मालमत्ता कराच्या ५०% दराने व १००१ चौ.फुटावरील निवासी अनधिकृत बांधकामांना प्रती वर्षी मालमत्ता कराच्या दुप्पट दराने शास्ती आकारण्याची तरतुद करण्यात आली आहे.
(३) हे खरे नाही.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५, च्या कलम १८९अ नुसार अनाधिकृत बांधकामांना मालमत्ता कराच्या दुप्पट शास्ती आकारण्यात येत होती.

तथापि, प्रस्तुत प्रश्नाच्या या मुद्द्यामध्ये नमुद वस्तुस्थिती विचारात घेऊनच, सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.५३ अन्वये या अधिनियमाच्या कलम १८९अ मध्ये सुधारणा करण्यात आली असून, त्यानुषंगाने दि.२७.०९.२०१८ अन्वये शास्तीसंदर्भातील परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे.
(४) होय.
(५) व (६) यासंदर्भात सन २०१८ मध्येच सुधारणा करुन शास्तीचे दर निश्चित करण्यात आलेले आहेत.
(७) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## कोकणातील सागरी महामार्गाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(३) * ९ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणासाठी महत्वाचा असलेल्या सागरी महामार्गाचे काम गत ३० वर्षांपासून प्रलंबित असून केवळ ७ सागरी पुलांचे काम पूर्ण न केल्यामुळे हा महामार्ग अपूर्ण आहे तसेच सदर महामार्गाचा सुरुवातीचा पूर्वनियोजित खर्च रुपये २ हजार कोटी एवढया रकमेचा होता परंतु, सद्य:स्थितीत सदरहू खर्च आता रुपये १० हजार कोटीपर्यंत गेला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रेवस (रायगड) ते रेडी (सिंधुदुर्ग) असा ४९८ कि.मी. लांबीचा कोकण ग्रीन फिल्ड एक्स्प्रेसवे होणार असून कोकणातील ३५ सागरी पर्यटन क्षेत्र या महामार्गामुळे जोडली जाणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सागरी महामार्ग तातडीने पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) रेवस ते रेडी या सागरी महामार्गावरील सुमारे ९३ सागरी पर्यटन क्षेत्र जोडणे प्रस्तावित आहे.
(३) प्रथम टप्प्यात रेवस रेडी या महामार्गावरील रुपये ९१०५ कोटी इतक्या रकमेची ९ खाडीपुलांची कामे हाती घेण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्धवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर शहरातील नगर नाका ते केंब्रिज चौक दरम्यानच्या रस्त्याचे व भुयारी मार्गाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(४) * ५३९ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर शहरातील नगर नाका ते केंब्रिज चौक या सहापदरी रस्ता व ९ भुयारी मार्गाच्या कामासाठी रुपये ७८९ कोटींच्या खर्चास मान्यता दिल्याची व या प्रकल्पाची घोषणा दिनांक २५ डिसेंबर, २०१५ रोजी तत्कालीन केंद्रीय परिवहन मंत्री यांनी केली असून, सदरहू कामास अद्यापही सुरूवात झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रीय महामार्ग विभागाने या प्रकल्पाचा आराखडा तयार करून अतिक्रमण हटविण्याची मोहीम हाती घेतली होती, परंतु यानंतरही प्रकल्पाचे काम पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, नगर नाका ते केंब्रिज चौक या सहापदरी रस्त्याच्या नियोजनानुसार एकही सिग्नल लागणार नाही आणि प्रमुख सहा ठिकाणी भुयारी मार्ग तयार होणार होते, मात्र, अद्याप एकही भुयारी मार्ग तयार करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रस्ता आणि भुयारी मार्गांची कामे वेळेत पूर्ण न झाल्याने शहरात वाहतूक कोंडी निर्माण झाली असून नागरिकांसह देश-विदेशातील पर्यटक, उद्योजक यांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नगर नाका ते केंब्रिज चौक या सहापदरी रस्त्याचा विकास व भुयारी मार्ग प्रकल्प पूर्ण होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१), (२) व (३) छत्रपती संभाजीनगर शहरातील नगर नाका ते केंब्रिज चौक (MSH ०२) या एकूण १५ कि.मी. लांबीचा रस्ता देखभाल दुरुस्तीकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे. One Time Improvement तत्वावर नगर नाका ते केंब्रिज स्कूल पर्यंत रस्त्याच्या दुरुस्तीचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत सन २०२२ मध्ये पूर्ण करुन रस्ता पुन:श्च सार्वजनिक बांधकाम विभागाकडे दिनांक २७ ऑक्टोबर, २०२२ रोजी हस्तांतरित करण्यात आला

आहे. छत्रपती संभाजीनगर शहरातील नगर नाका ते केंब्रिज चौक सहापदरी रस्ता व नऊ भुयारी मार्गाच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तसेच भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत कोणतीही मंजूरी देण्यात आलेली नाही.

(४) छत्रपती संभाजीनगर शहरातील वाहतूक कोंडी विचारात घेऊन भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत बाहयवळण रस्ता (राष्ट्रीय महामार्ग क्र.५२) करण्यात आला आहे.

(५) छत्रपती संभाजीनगर शहरातील नगर नाका ते केंब्रिज चौक सहापदरी रस्ता व नऊ भुयारी मार्गाच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तसेच भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत कोणतीही मंजूरी देण्यात आलेली नाही.

(६) प्रश्न उद्धवत नाही.

-----------------

## मुंबई-नाशिक महामार्गावरील माजिवडा ते वडपे रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(५) * २७७ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महत्वाचा प्रकल्प असलेल्या मुंबई-नाशिक महामार्गावरील माजिवडा ते वडपे या मार्गाच्या रुंदीकरणाचे ६४ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित ३६ टक्के काम माहे जून, २०२५ अखेर पर्यंत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (एमएसआरडीसी) पूर्ण करण्याचे नियोजित असून खारेगाव टोलनाका परिसरातील खारेगाव खाडीपुलाचे रुंदीकरण अद्याप रस्ते विकास महामंडळाकडे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई-नाशिक महामार्ग हा वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाचा असल्यामुळे सदर मार्गांवरुन हलक्या वाहनांसह अवजड वाहनांची वाहतूकही होते, परंतु महामार्गाचा दर्जा असतानाही सदर मार्गावर अनेक ठिकाणी रस्त्याची दुरवस्था होऊन काही भागात हा रस्ता अत्यंत अरुंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी प्राधिकरणाकडून रस्त्यांच्या रुंदीकरणाचे काम तातडीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) ठाणे (माजिवडा) ते वडपे मार्गाच्या रुंदीकरणाचे काम ६७% पूर्ण झाले आहे. खारेगांव खाडीपुलाचे काम प्रगतीपथावर असून ७१% काम पूर्ण झाले आहे.

(२) सद्य:स्थितीत महामार्गाचे रुंदीकरणाचे काम प्रगतीपथावर असून सदर काम करताना मुख्य रस्त्यावरील वाहतूक ही सेवा रस्त्यावरुन वळविण्यात आली आहे. काम पुर्ण झाल्यावर ८ मार्गिकेचा मुख्य रस्ता व २ मार्गिकेचे दुतर्फा सेवा रस्ते वाहतुकीसाठी उपलब्ध होणार आहे.

(३) वाहतूक विभागाच्या समन्वयाने रहदारीचे नियंत्रण करुन, रुंदीकरणाचे काम जलद गतीने करून मे, २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्धवत नाही.

-----------------

## पंतप्रधान आवास योजनेंतर्गत खाजगी विकासकाचा भागीदारी प्रकल्प सुरु होण्यापूर्वी अधिक रकमेचे वितरण करण्यात येत असल्याबाबत

**(६) * १३१ श्री.सचिन अहिर, श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान आवास योजनेंतर्गत खाजगी विकासकाचा भागीदारी प्रकल्प सुरु होण्याआधीच राज्य आणि केंद्र शासनाच्या हिश्श्यापोटी रुपये ५० कोटींहून अधिक रकमेचे वितरण झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गृहनिर्माण विभागाने याबाबत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडून तातडीने अहवाल मागविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय, प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) कार्यान्वित न झालेल्या व निधी देय नसलेल्या प्रकल्पांना निधी देण्यात आल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे.

(२) होय.

(३) प्रस्तुत प्रकरणी दिनांक ६ मार्च, २०२५ रोजीच्या पत्रान्वये म्हाडा प्राधिकरणाने अहवाल सादर केला असून, सदर अहवाल शासन मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईतील खारघर-नेरूळ किनारा मार्गाचा प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(७) * १०२४ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील गत अनेक वर्षांपासून खारघर-नेरूळ किनारी मार्गाचा रुपये ११०० कोटी खर्चाचा प्रकल्प विविध कारणांमुळे प्रलंबित असून, प्रकल्पाच्या कामांसाठी शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (सिडको) यांनी काढलेल्या निविदेवर लोकप्रतिनिधींनी आक्षेप घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहर आणि औद्योगिक विकास महामंडळाच्या मर्जीतील ठेकेदारांना कंत्राट देता यावे यासाठी नियमाबाह्य व जाचक अटी समाविष्ट करुन देशातील नामांकित कंत्राटदारांना दूर ठेवण्याचा प्रयत्न केल्याची तक्रार लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने यासाठी जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) खारघर ते नेरुळ दरम्यानच्या कोस्टल रोड संबंधीत निविदेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.१८.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये आक्षेप घेतला आहे, हे खरे आहे.

खारघर ते नेरुळ प्रस्तावित कोस्टल रोड प्रकल्पांतर्गत खारघर परिक्षेत्रातून जाणाऱ्या सेक्टर १६ ते खारघर रेल्वेस्टेशन पर्यंतच्या रस्ते बांधणीसाठी ई-निविदा दि.२०.९.२०२४ अन्वये अंदाजित रु.१०९६/- कोटी वाटप कामासाठी मागविण्यात आल्या होत्या. निकषांची पुस्तिका मार्च, २०१५" नुसार सर्वसाधारण निविदा काढण्यात येतात. त्यामध्ये रु.१०० कोटी व त्यापेक्षा जास्त कामांच्या बोलीसाठी संयुक्त उपक्रमास (JV/ Consortium) परवानगी देण्याची तरतूद आहे. तथापि, सदर काम मुख्यत्वे "ब्रीज वर्क व तत्सम" या एकाच प्रकारातील असल्याने एकल बोलीधारकांना तत्सम अनुभव आवश्यक असल्याने संयुक्त उपक्रमास (JV/ Consortium) उक्त प्रकल्पाच्या निविदेमध्ये परवानगी दिलेली नाही.

तसेच सदर कामाचे स्वरुप मुंबई महानगरपरिक्षेत्र Mumbai Metropolitan Region मधील कामांच्या स्वरुपास अनुरुप (जसे खाडी किनारा, कांदळवन क्षेत्र व दलदल इ.) असल्याने Mumbai Metropolitan Region मध्ये कामाचा अनुभव असणे ही बाब निविदेतील अटी व शर्ती मध्ये अंतर्भूत करण्यात आली आहे. सिडकोच्या बोली मुल्यमापन समितीच्या शिफारशीनुसार न्युनतम (L-१) निविदाधारक यांना काम प्रदान करण्याचा प्रस्ताव सिडको संचालक मंडळाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## पुणे शहरातील कात्रज-कोंढवा रस्त्याचे रुंदीकरण प्रलंबित असल्याबाबत

**(८) * १०६९ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील कात्रज-कोंढवा रस्ता रुंदीकरण प्रकल्पास रुंदीकरणातील अनिश्चितता (८४ मीटर की ५० मीटर), रोखीने मोबदला न देणे तसेच टीडीआर व एफएसआय मोबदल्यासंबंधीच्या दिरंगाई यामुळे सात वर्षांचा विलंब झाला असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी जागा मालकांना थेट रोख स्वरूपात मोबदला देण्यात येणार असल्याने भूसंपादनाचा एकूण खर्च रुपये ४०० कोटींनी वाढला असल्याचे तसेच भूसंपादनासाठी शासनाकडे २८० कोटी रुपयांच्या केलेल्या मागणीपैकी १३९ कोटी रुपये (५०% रक्कम) मिळाले असून अद्याप जागा ताब्यात घेण्यात आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भूसंपादनाच्या बदल्यात नागरिकांनी टीडीआर, एफएसआय घ्यावा यासाठी प्रयत्न केला जात आहे पण त्यासाठी महानगरपालिकेची किचकट प्रक्रिया, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे असहकार्य, प्रत्येक विभागात त्रुटी काढून नस्ती प्रलंबित ठेऊन अडवणूक केली जाणे इ.मुळे जागा मालक त्रस्त होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कात्रज-कोंढवा रस्ता रुंदीकरण प्रकल्प तातडीने पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

कात्रज-कोंढवा रस्त्याच्या भूसंपादनासाठी नगरोत्थान महाअभियानांतर्गत शासनाकडून १३९.८३ कोटी रुपये पुणे महानगरपालिकेस जून २०२४ मध्ये वर्ग करण्यात आले आहेत.

कात्रज-कोंढवा रस्त्यातील नियोजित उड्डाण पुलाचे काम पूर्ण होणेकामी मालमत्ता व व्यवस्थापन विभागामार्फत तडजोडीने रोख मोबदल्यापोटी १३ मिळकतींचा ताबा विहित मुदतीत घेण्यात आलेला आहे. तसेच ८ मिळकतींचा रोख मोबदल्यापोटी ताबा घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

पुणे महानगरपालिकेमार्फत कात्रज-कोंढवा रस्त्यातील जागा टीडीआर/FSI अन्वये ताब्यात घेणेच्या दृष्टीने प्रोत्साहन देणेसाठी महापालिका आयुक्त यांचे ठराव क्र.६/८६७, दि.२८/१/२०१९ अन्वये टीडीआर प्रकरणांचे प्रशासकीय शुल्क (३२०००/-) माफ करणेस व हमीपत्र, शपथपत्र, बंधपत्र ॲपेडेव्हीट इ. खर्च पुणे मनपामार्फत करणेस व कात्रज-कोंढवा रस्तारुंदीकरणामध्ये बाधित होणाऱ्या मिळकतीच्या संयुक्त मोजणीच्या रेखांकनाचा खर्च पुणे मनपा मार्फत करणेस मान्यता प्राप्त आहे. त्याअनुषंगाने खात्यामार्फत कार्यवाही करणेत येते.

FSI व रोख स्वरुपात प्राप्त प्रस्तावांची ताब्याची कार्यवाही मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडून विहित मुदतीत करण्यात आलेली आहे.

टी.डी.आर. व एफ.एस.आय. पोटी बांधकाम विकास विभागाकडे परिपूर्ण दाखल प्रस्तावावर त्वरित कार्यवाही करण्यात येते.

(४) कात्रज-कोंढवा रस्त्याचे ८४ मी पैकी ५० मी.रुंदीचे भूसंपादन करणेसाठी जिल्हाधिकारी यांचेकडे जा.क्र.एलएएम/११३४ दि.१२/०९/२०२४ अन्वये प्रस्ताव पाठविण्यात आला असून पुढील प्रक्रिया सुरु आहे.

उर्वरीत ३४ मी. रुंदीचे रस्त्याचे भूसंपादन करण्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या मुख्य सभेने ठराव क्र.३८४, दि.१७/०१/२०२५ अन्व्ये मान्यता दिली असून ३४ मी.रुंदीसाठीचा भूसंपादनाचा प्रस्ताव लवकरच जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करण्यात येणार आहे. त्यामुळे कात्रज-कोंढवा रस्त्याचे ५० मी. व ३४ मी. अशा दोन टप्प्यामध्ये एकूण ८४ मी. साठी भूसंपादन करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उत्तम नगर (ता.हवेली, जि.पुणे) येथील महानगरपालिकेच्या हद्दीतील आरोग्य उपकेंद्र विजेअभावी बंद असल्याबाबत

**(९) * १३५४ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उत्तम नगर (ता.हवेली, जि.पुणे) येथील महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या आरोग्य उपकेंद्राला विविध समस्यांना सामोरे जावे लागत असून, हे उपकेंद्र मागील दीड वर्षापासून विजेअभावी बंद असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे महानगरपालिकेमध्ये समावेश झालेल्या सर्वच गावांचा तातडीने आढावा घेऊन सर्वसामान्य नागरिकांना देय असणाऱ्या आरोग्य, पाणी, वीज व इतर सर्व मूलभूत सोयी सुविधा देण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

सदर उपकेंद्रे जिल्हा परिषद, पुणे यांच्या अखत्यारीत असून ते अद्याप पुणे महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेली नाही. पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट गावांमधील आरोग्य संस्था हस्तांतरीत करण्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे महानगरपालिकेकडून पत्रव्यवहार करण्यात आला आहे.
(२) पुणे महानगरपालिकेमध्ये समावेश झालेल्या ३४ गावांना महानगरपालिकेकडून मूलभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली ३४ गावांमधील लोकप्रतिनिधींची समिती गठीत करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जिहे कठापूर उपसा सिंचन योजनेंतर्गत (ता. कोरेगाव, जि.सातारा) कृष्णा नदीवर बांधण्यात आलेल्या बॅरेजबाबत

**(१०) * १४३२ श्री.शशिकांत शिंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गुरुवर्य कै.लक्ष्मणरावजी इनामदार जिहे कठापूर उपसा सिंचन योजनेंतर्गत (ता. कोरेगाव, जि.सातारा) कृष्णा नदीवर मौजे कठापूर येथे ०.३५ टी.एम.सी. क्षमतेचे बॅरेज बांधण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू बॅरेजमधून पाणी उचलून नेर धरणात सोडण्यात येऊन साठा केला जात असल्याने तांदुळवाडी, मंगळापूर, कठापूर व गोजेगांव या गावातील जिरायती शेतजमिनी पाण्याखाली गेल्या असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त गावांमधील शेतकऱ्यांच्या जिरायती शेत जमिनी पाण्याखाली गेल्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने नुकसानग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत बॅरेजमध्ये नदीपात्रामध्येच पाणीसाठा करण्यात येत आहे. बॅरेजमध्ये पूर्ण क्षमतेने पाणीसाठा केल्यानंतर तांदुळवाडी, मंगळापूर, कठापूर व गोजेगाव मधील नदीलगतची अंशत: शेतजमीन

पाण्याखाली जाणार आहे. या गावातील बुडीत क्षेत्राचे संपादन पूर्ण झाल्यानंतरच बॅरेजमध्ये पूर्ण क्षमतेने पाणीसाठा करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सार्वजनिक बांधकाम विभागातील अनुसूचित जमातींसाठीच्या २९ राखीव पदांबाबत

**(११) * १४८४ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागात अनुसूचित जमातींसाठी राखीव असलेली २९ पदे दाखविण्यात आली नसल्याची बाब दिनांक १० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास माहिती अधिकारातून निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिसंख्य पदावर १०९ जणांना वर्ग केल्यानंतर ती पदे रिक्त न दाखविता केवळ ८० पदे रिक्त दाखविण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुसूचित जमाती प्रवर्गाला न्याय देण्यासाठी शासनाने उमेदवारांची विशेष पद भरती मोहिम राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे,

(४) असल्यास, सदरहू अनुसूचित जमातीची पदे भरण्याबाबत तसेच सदर राखीव पदे न दाखविणाऱ्या संबंधितांविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) व (२) नाही.

९६ कर्मचारी अधिसंख्य पदावर कार्यरत आहेत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तापी-पूर्णा नदी संगमावरील चांगदेव-मेळसांगवे बेटावर (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) गावठी दारूचा अवैध व्यवसाय सुरु असल्याबाबत

**(१२) * १५७५ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तापी-पूर्णा नदी संगमावरील चांगदेव-मेळसांगवे बेटावर (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) गावठी दारूचा अवैध व्यवसाय सुरु असून गावठी दारूचे अड्ड्यावर धाडी टाकून संबंधितांवर कायदेशीर कारवाई होणे संदर्भात लोकप्रतिनिधीनी दिनांक ३० डिसेंबर, २०२४ रोजी अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, जळगाव यांचेकडे पत्राद्वारे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी व्यसनाधिनता तसेच अवैध दारू व्यवसाय रोखण्याकरिता सदर व्यावसायिकांवर प्रतिबंध घालून कायदा व सुव्यवस्थेचे संरक्षण व्हावे या उद्देशाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, तसेच उक्त प्रकरणी दोषींविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) तापी-पूर्णा नदी संगमावरील चांगदेव-मेळसांगवे बेटावर राज्य उत्पादन शुल्क विभागातील विविध अधिकाऱ्यांनी गोपनीयरित्या, स्वतंत्रपणे आणि वेगवेगळया वेळी पडताळणी केली असता सदर बेटावर अवैध हातभट्टी निर्मिती व्यवसाय चालू नसल्याचे आढळून आले.

माात्र, मुक्ताईनगर तालुक्यातील तापी व पूर्णा नदी किनाऱ्यावरील चांगदेव, मेळसांगवे, उचुंदा व मानेगाव परिसरातील नाल्यांवरील अवैध दारु व्यवसायांवर राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून कारवाई करण्यात आलेली आहे.

मुक्ताईनगर तालुक्यामध्ये माहे जानेवारी, २०२५ व फेब्रुवारी, २०२५ या दोन महिन्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाने एकूण २९ गुन्हे नोंदविलेले असून रु. ७,८०,७१०/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

मुक्ताईनगर तालुक्यामध्ये हातभट्टी निर्मिती होऊ नये यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून पडताळणी करून मोहिमा राबवून नियमित कारवाया करण्यात येत आहेत. तसेच, पोलीस विभागाच्या मदतीने सुद्धा हातभट्टी विरुद्ध कारवाया करण्यात येतात. महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ च्या कलम ९३ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई केली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देवळाली (ता.जि.नाशिक) शिवारातील सर्व्हे नंबर २९५/१ येथील टीडीआर गैरव्यवहाराबाबत

**(१३) * १६८४ श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवळाली (ता.जि.नाशिक) शिवारातील सर्व्हे नंबर २९५/१ येथील टीडीआर गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी ८ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक महानगरपालिका हद्दीतील सर्व्हे नंबर ५०५/१ अ आडगाव शिवार क्षेत्र ५३१० चौ.या मिळकतीची शासकीय बाजारमुल्याप्रमाणे स्टँप ड्यूटी न भरल्याने १७.६२ कोटी रुपयांचा मुद्रांक शुल्क बुडविल्याप्रकरणी नाशिक शहरातील आडगाव पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक मनपा हद्दीतील सर्व्हे नंबर ८७०/अ/१ प्लॉट नंबर १ तसेच सर्व्हे नंबर ७०३ तसेच म्हसरूळ सर्व्हे नंबर २५० या प्रकरणांमध्ये सुद्धा टीडीआर देतांना गैरप्रकार झाल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी दोषी असलेल्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नाही, मात्र मौजे देवळाली शिवारातील सर्व्हे क्र.२९५ (पै) मधील आरक्षित जागेच्या मोबदल्यात टीडीआर दिल्याप्रकरणी उपायुक्त, प्रशासन, नाशिक महानगरपलिका यांचे अध्यक्षतेखालील चौकशी समितीने आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांना अहवाल सादर केला असून सदर प्रकरण सद्यस्थितीत न्यायप्रविष्ट आहे.
(२) प्रस्तुत मिळकतीचे मुळ मालक श्री. मोहनसिंग गुरबचनसिंग गोगना (राजपुत) तर्फे जनरल मुखत्यार श्री. नरेंद्र मनोहरलाल ठक्कर यांचेशी मिळकतीचा व्यवहार करतांना श्री.राजेंद्र एम.डेव्हलपर्स ॲन्ड बिल्डर्स प्रा.लि.डायरेक्टर, श्री.जितेंद्र मनोहरदास ठक्कर यांनी बनावट दस्त संगनमताने तयार करून, रु.१७,६२,९२,०००/- वरील सरकारी बाजार मुल्याप्रमाणे स्टॅम्प ड्युटी न भरता तसेच भुसंपादन मोबदल्याची रक्कम स्वतःकडे येण्यासाठी बनावट दस्त केले तसेच शासनाचा महसूल बुडवून फसवणुक केली म्हणुन त्यांचे विरूध्द कायदेशीर कारवाई होण्यासाठी आडगाव पोलिस ठाण्यात दि.२७.१२.२०२४ रोजी एफआयआर नोंदविण्यात आला आहे.
(३), (४) व (५) नाशिक सर्व्हे क्र.८७०/अ/१, भुखंड क्र.१ या क्षेत्रास टीडीआर दिलेला नाही.

सर्व्हे क्र.७०३ मधील विविध पोटहिस्यातील क्षेत्रासाठी सन २००१-२०२२ या कालावधीत एकून १२ टीडीआर प्रस्ताव मंजूर आहेत. तथापि, माहे डिसेंबर २०२४ मध्ये वा त्यासुमारास याप्रस्तावात गैरप्रकार झाल्याची नाशिक महानगरपालिकेकडे तक्रार प्राप्त नाही.

म्हसरुळ येथील सर्व्हे क्र.२५० मध्ये टीडीआर प्रस्ताव मंजूर आहे. या प्रकरणी मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्याकडे दि.११.०७.२०२४ रोजी आयोजित बैठकीतील निदेशानुसार नगर रचना संचालनालय, नोंदणी महानिरीक्षक तसेच मुद्रांक महानिरीक्षक, पुणे आणि आयुक्त, नाशिक महानरपालिका यांचा अहवाल प्राप्त करून घेण्यात आला आहे. सद्यस्थितीत प्रस्तुत प्रकरण मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.७०/२०२४ नुसार न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## लोअर परळ (मुंबई) येथील पुलाच्या बांधकामादरम्यान विस्थापित झालेल्या झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(१४) * १८१८ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोअर परळ (मुंबई) येथील धोकादायक ठरलेल्या पुलाचे बांधकाम निष्कासित करण्यात आले असून सदर पुलाखालील १८ झोपड्यांमध्ये सुमारे ५० वर्षांपासून वास्तव्य करीत असलेल्या रहिवाशांचे आजमितीपर्यंत पुनर्वसन करण्यात आले नसल्याची बाब दिनांक ५ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रहिवाशांकडे वास्तव्याचे सर्व अधिकृत पुरावे उपलब्ध आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लोअर परळ (मुंबई) येथील धोकादायक ठरलेला पूल पाडताना पुलाखालील जमीनदोस्त करण्यात आलेल्या १८ झोपड्यांमधील सर्व पात्र रहिवाशांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही,
(२) व (३) मुंबईतील लोअर परळ येथील रेल्वे मार्गावरिल पूल दि.१७.०७.२०१८ रोजी धोकादायक घेषित करण्यात आला. हा पूल नव्याने बांधण्यासाठी दि.२४.०७.२०१८ रोजी तोडण्यात आला. सदर पुलाच्या लगत असलेल्या १७ झोपड्या बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निष्कासित करण्यात आल्या. या पात्र १७ झोपडीधारकांचे महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणानुसार लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (पश्चिम) येथे दि.०७.०६.२०१९ रोजी कायमस्वरूपी पुनर्वसन करण्यात आले.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेत पर्यावरणासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करण्याबाबत

**(१५)** * **२२४८ श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे शिक्षण तसेच आरोग्य असे वेगवेगळे विभाग आहेत, परंतु महानगरपालिकेकडे पर्यावरणासाठी वेगळा विभाग नसून मुंबईतील वाढते वायू प्रदूषण पहाता पर्यावरण करिता वेगळा विभाग करुन त्या विभागालाही वेगळे बजेट द्यावे, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे दिनांक ३ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास केली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेने पर्यावरणासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करून वेगळे बजेट देण्याबाबत शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये ऑक्टोबर २०२४ पासून स्वतंत्र पर्यावरण विभागाची स्थापना करण्यात आली असून सद्यस्थितीत हा विभाग कार्यरत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सन २०२५-२०२६ या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये पर्यावरण विभागासाठी रू.११३.७ कोटी इतक्या रकमेची तरतुद करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक महानगरपालिकेने विकासकांना म्हाडास सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेकरिता उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या भुखंडाच्या मोबदल्यात एफएसआय/ टीडीआर देण्याबाबत

**(१६) * ३४८ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिकेमार्फत सुमारे बारा विकासकांना एफएसआय/टीडीआर देण्यात येत नसल्याने विकासकांनी म्हाडास राखीव क्षेत्र हस्तांतरीत करण्यास असमर्थता दर्शविली जात असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अत्यल्प व अल्प गटासाठी असलेल्या अंदाजे ५ हजार घरांचे गृहनिर्माण योजना राबविण्यात समस्या उद्भवत असून याप्रकरणी नाशिक महानगरपालिकेला सूचना देण्याबाबत म्हाडाने शासनाकडे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक महानगरपालिकेने विकासकांना म्हाडास सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेकरिता उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या भुखंडाच्या मोबदल्यात एफएसआय/ टीडीआर देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हो, हे खरे आहे.

(२) हो, हे खरे आहे.

(३) याबाबत नगर रचना संचालनालयाकडून तसेच नाशिक महानगरपालिकेकडून अहवाल मागविण्यात आला असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासनस्तरावरून तसेच नाशिक महानगरपालिका व म्हाडास यथायोग्य मार्गदर्शन केले जाईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कळमनुरी (जि.हिंगोली) शहराच्या रस्ते विकास प्रकल्पासाठी काढण्यात आलेल्या ई-निविदेमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(१७) * १२२ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती (राज्यस्तरीय) नगरोत्थान महाअभियान योजनेंतर्गत कळमनुरी नगरपरिषदेच्या ठराव क्र. ५२ नुसार कळमनुरी शहराच्या रस्ते विकास प्रकल्पासाठी काढण्यात आलेल्या रुपये ६९,६६,४९,३०१.४२ च्या ई-निविदेमध्ये अटी व शर्तीची पुर्तता न करणाऱ्या तसेच पात्र नसलेल्या कंत्राटदारांना रस्त्यांची कामे देण्यात आल्याची बाब दिनांक १ जानेवारी, २०२५ रोजी वा सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निविदेमधील रस्त्यांच्या कामांमध्ये ज्या ठिकाणी सिमेंटचा रस्ता उपलब्ध आहे अशा ठिकाणी डांबरी रस्त्यांची कामे दर्शविण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेमार्फत कंत्राटदाराने केलेली रस्त्यांची कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची असून नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी यांनी कंत्राटदाराशी आर्थिक संगनमत करुन शासनाच्या कोट्यवधी रुपयाच्या निधीमध्ये अनियमितता केल्याने त्याची चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान करुनही कोणतीही कार्यवाही शासनाकडून करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कळमनुरी शहराच्या रस्ते विकास प्रकल्पाच्या ई निविदेतील अटी व शर्तीनुसार कागदपत्रांची पुर्तता व रस्त्यांची कामे न करणाऱ्या कंत्राटदारांवर गुन्हा दाखल करुन त्यांचा समावेश काळ्या यादीत करण्यात यावा तसेच नगरपरिषदेच्या संबंधित दोषी अधिकारी/ कर्मचारी यांना निलंबित करुन त्यांच्याविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानंतर्गत कळमनुरी शहरासाठी मंजूर रस्ते विकास प्रकल्पाची विहित कार्यपध्दतीनुसार निविदा प्रक्रिया राबवून दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४ रोजी पात्र कंत्राटदारास नगरपरिषदेकडून कार्यादेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

(२) हे खरे नाही.

कळमनुरी नगरपरिषदमार्फत प्रस्तावित करण्यात आलेला सदरील रस्ता हा भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, वाशिम यांच्या अखत्यारीत होता तो कळमनुरी नगरपरिषदेस डांबरीकरणाच्या स्थितीत रुंदीकरणासाठी हस्तांतरित करण्यात आला.

(३), ( ४) व (५) हे खरे नाही.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत मंजूर कळमनुरी शहर रस्ते विकास प्रकल्पाच्या कामाच्या अनुषंगाने सन्माननीय लोकप्रतिनिधींचे निवेदन शासनास प्राप्त झाले असून सदर निवेदनाच्या अनुषंगाने मुख्याधिकारी, कळमनुरी नगरपरिषद यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला होता. त्यात सदर कामाचा दर्जा समाधानकारक असल्याचे त्रयस्थ तांत्रिक तपासणी अहवालात नमूद केल्याचे मुख्याधिकारी, कळमनुरी नगरपरिषद यांनी त्यांच्या अहवालात नमूद केलेले आहे. तथापि, सदर रस्ते विकास प्रकल्पाच्या अनुषंगाने सन्माननीय लोकप्रतिनिधींच्या निवेदनामधील उपस्थित मुद्दे व त्यानुषंगाने मुख्याधिकारी, कळमनुरी नगरपरिषद यांचा शासनास सादर केलेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे यांची तपासणी करून व आवश्यक असल्यास इतर कागदपत्रे कळमनुरी नगरपरिषदेकडून घेऊन स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल शासनास सादर करण्याबाबत नगरपरिषद प्रशासन संचालनालयास कळविण्यात आलेले आहे.

-----------------

## पुणे येथील कात्रज उड्डाणपुलाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(१८) * ११५० श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील कात्रज चौकातील वाहतूक कोंडी दूर होण्यासाठी वंडर सिटी ते राजेश सोसायटी या सहापदरी उड्डाणपुलाचे भूमिपूजन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री यांच्या हस्ते सन २०२१ मध्ये करण्यात आले

असतानाही अद्यापपर्यंत काम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत ठेकेदाराला दोन वेळा मुदतवाढ दिल्यानंतरही पूलाचे काम अर्धवट झाले असून गत अनेक दिवसांपासून कात्रज चौकातील वाहतूक वळविण्यात आल्याने नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धोकादायक क्रेनच्या माध्यमातून सद्य:स्थितीत काम सुरू असून, कोणतीही सुरक्षा नसल्याने वाहनांचा अपघात होण्याची भिती व्यक्त केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर काम पूर्ण करण्यास दिरंगाई करणाऱ्या ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली आहे तसेच सदर पुलाचे काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) होय, हे खरे आहे.

वडगाव (नवले पूल)-कात्रज-मंतरवाडी-थेऊर फाटा-लोणीकद रस्ता, राष्ट्रीय महामार्ग क्र.५४८DD असून सदर महामार्गावरील कात्रज चौक येथील उड्डाणपुलाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून प्रगतीत आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

सदर कामाच्या ठेकेदारास दिनांक ३०.१२.२०२४ पर्यंत पहिली मुदत वाढ देण्यात आलेली असून दिनांक ३१.१२.२०२५ पर्यंत दुसऱ्या मुदत वाढीचा प्रस्ताव रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयास सादर करण्यात आला आहे वाहतूक पोलीस यंत्रणेची वाहतूक व्यवस्थापन आराखड्यास मंजुरी घेऊन सर्व आवश्यक उपाययोजना करून वाहतूक पोलिसांच्या देखरेखीखाली कात्रज चौकातील उड्डाणपुलाच्या मुख्य गाळयाचे बांधकाम करण्यासाठी दिनांक ०६.१२.२०२४ पासून वाहतूक वळविण्यात आली होती. सद्यस्थितीत कात्रज चौकातील उड्डाणपुलाच्या मुख्य गाळयाच्या (Main span) गर्डरचे काम पूर्ण करण्यात आले असून, पुढील गाळयाच्या गर्डरचे काम प्रगतीत आहे.

(३) वाहतूक पोलीस यंत्रणेच्या सूचनांनुसार त्यांची मंजुरी घेऊन व त्यांचे देखरेखीखाली सदर काम हे पूर्ण सुरक्षेच्या विहित उपाययोजना करून करण्यात येत आहे. तसेच सद्यस्थितीत सदर पुलाचे मुख्य चौकातील गाळयाचे गर्डरचे काम पूर्ण झाले असून, क्रेन पूर्णतः वाहतूकीच्या स्थळापासून दूर असून आवश्यक त्या सर्व वाहतूक सुरक्षा योजना करण्यात आल्या आहेत.

(४) व (५) पूलाच्या जागेसाठी भूसंपादनातील विलंब, जागेवरील अतिक्रमणे, प्रकल्प संकल्पनातील बदल इ. बाबींमुळे काम विहीत कालावधीत पूर्ण होण्यास विलंब झाला आहे. सदर पुलाच्या कामासाठी पुणे महानगरपालिका यांचेमार्फत आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यात येत असून, जागा उपलब्धतेप्रमाणे आजमितीस सुमारे ५५ टक्के काम पूर्ण करण्यात आले आहे. कात्रज चौकातील उड्डाणपूलासाठी आवश्यक जागा भूसंपादन कायद्यान्वये दिनांक २५.२.२०२५ रोजी पुणे महानगरपालिकेनी ताब्यात घेतलेली आहे. सद्यस्थितीत काम पूर्ण क्षमतेने सुरू असून काम दिनांक ३१.१२.२०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

-----------------

## तिलारी धरणाच्या (ता. दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) उजव्या व डाव्या कालव्याला भगदाड पडल्याने शेतीचे नुकसान झाल्याबाबत

**(१९) * १३७६ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिलारी धरणाच्या (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) उजव्या व डाव्या कालव्याला भगदाड पडल्याने या कालव्याचे पाणी लगतच्या शेती बागायतीत शिरुन या परिसरातील शेती व शेत पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तिलारी धरणाच्या (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) उजव्या कालव्याचे व डाव्या कालव्याचे काम गत वर्षी केले असतानाही पुन्हा त्याच ठिकाणी कालवे फुटल्याने केलेले काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे गोवा राज्याचाही पाणीपुरवठा अनिश्चित काळासाठी बंद राहणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या कालव्याच्या दुरुस्तीसाठी कोट्यवधी रुपये खर्च करून देखील कालवे फुटत असल्याने सदर कामाच्या गुणवत्तेचे पुनरावलोकन करण्यासाठी गुणवत्ता नियंत्रण कक्षाकडून तपासणी करून संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

तिलारी कालव्याची बांधकामे सुमारे ३० ते ३५ वर्षापुर्वी म्हणजेच सन १९८४ ते १९९५ या कालावधीत झालेली आहेत.

दि. २४.०१.२०२५ रोजी तिलारी डावा तीर कालवा कि.मी. १४ मधील सा.क्र.१३/११० मी. येथील पाईप मोरीतून गळती होऊन सेवा पथाकडील कालव्याच्या भरावाची माती वाहून गेली. गळतीमुळे कालव्याचे पाणी पाईप मोरीतून नाल्याद्वारे आजूबाजूच्या शेतामध्ये व मणेरी कुडासे रस्त्यावर आले होते. नाल्याच्या आजूबाजूच्या ११ गुंठे क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले असून, महसूल व कृषी विभागामार्फत पंचनामे करण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने पिकांचे नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही जलसंपदा विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयामार्फत प्रगतीपथावर आहे. तिलारी धरणाच्या उजव्या कालव्याला भगदाड पडलेले नाही.

(२) हे खरे नाही.

तिलारी डावा तीर कालवा कि.मी. १४ मधील सा.क्र.१३/११० मी. वरील नलिका मोरीतून दि. १७.०८.२०२४ रोजी गळती होऊन निरीक्षण पथाकडील कालव्याच्या भरावाची माती वाहून गेली होती. त्याची तात्काळ दुरूस्ती देखील करण्यात आली होती. तसेच, डावा तीर कालवा कि.मी. १४ मधील सा.क्र. १३/११० मी. नलिका मोरीतून दि. २४.०१.२०२५ रोजी सेवापथाच्या बाजूने कालव्याच्या भरावाची माती वाहून गेल्याचे निदर्शनास आले व त्याची तात्काळ दुरूस्ती करण्यात आली. गतवर्षी केलेले काम पुन्हा

क्षतीग्रस्त झालेले नाही. त्यामुळे केलेले काम निकृष्ट दर्जाचे झाले, ही बाब खरी नाही.
(३) हे खरे नाही.

गोवा राज्याचा पाणीपुरवठा दि. २४.०१.२०२५ ते दि. ०२.०२.२०२५ या ७ दिवसांच्या कालावधीत बंद होता. सदरची कामे अतितातडीने पुर्ण करण्यात येऊन दि.०३.०२.२०२५ रोजी कालवा प्रवाह पुर्ववत करण्यात आला असून गोवा राज्याचा पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील मोबाइल टॉवर कंपन्यांकडे महानगरपालिकेची थकबाकी असल्याबाबत

**(२०) * २१४१ श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील मोबाईल इंटरनेटचा वाढता वापर लक्षात घेता उक्त सेवा पुरविणाऱ्या कंपन्यांनी महानगरपालिका हद्दीत मोबाईल टॉवर उभारुन उद्योग व्यवसाय वाढवून कर भरण्याकडे दुर्लक्ष केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर महानगरपालिकेने केलेल्या नोंदीमध्ये ११८९ टॉवर असून मोबाईल टॉवर कंपन्यांकडे महानगरपालिकेची रुपये ७२ कोटीची थकबाकी असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मोबाईल टॉवरमुळे येथील नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे व पर्यावरणाचेही नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी मोबाईल टॉवर कंपन्यांकडून कर थकबाकी तातडीने वसूल करण्याबाबत व पर्यावरणाचे धोके लक्षात घेवून त्याबाबत उपाययोजना करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे

नागपूर शहरात एकूण ८ मोबाईल टॉवर कंपन्या असून या मोबाईल टॉवर कपन्यांचे १३२९ मोबाईल टॉवर मालमत्ता कर निर्धारण कक्षेत आहेत. या ८ कंपन्यांकडे सद्यस्थितीत रु. ५९.२४ कोटी इतकी थकबाकी आहे.
(३) व (४) शासन निर्णय दि. ०५.०२.२०२५ नुसार केंद्र शासनाचे दूरसंचार नियम (Telecommunications (Right of Way) Rules) २०२४ दि. ०१.०१.२०२५ पासून राज्यात लागू करण्यात आले आहेत. त्यानुसार मोबाईल टॉवर्ससंदर्भात कार्यवाही करण्यात येते.

मा. सर्वोच न्यायालयाच्या आदेशानुसार आतापर्यंत मे. ए.टी.सी. मोबाईल टॉवर कंपनी आणि मे. जी.टी.एल. मोबाईल टॉवर कंपनी यांनी अनुक्रमे रु. ५५,२७,९४८ व रु. ६७,०८,४२८ इतकी मालमत्ता कराची रक्कम जमा केली आहे.

तसेच थकीत मालमत्ता कर रक्कम वसुल करणेबाबत आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांनी वेळोवेळी बैठक आयोजित करून संबंधित मोबाईल टॉवर कंपन्याच्या प्रतिनिधींना थकित रक्कम जमा करण्याचे निर्देश दिले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य लॉटरी बंद करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(२१) * १००९ श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाकडून चालविण्यात येणारी महाराष्ट्र राज्य लॉटरी बंद करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्यामुळे राज्यातील लॉटरी विक्रेते चिंतेत असून, सदरहू लॉटरी बंद झाल्यास राज्यातील सुमारे २० हजार लॉटरी विक्रेत्यांचा व्यवसाय बंद होऊन ते बेराजगार होणार आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, समाजातील मटका व जुगार ह्या व्यसनांना प्रतिबंध घालून, त्यातून होणारी जनसामान्यांची फसगत टाळण्यासाठी, राज्याच्या वित्त विभागाने ह्या लॉटरीची सुरुवात केली असून, लॉटरी विक्रीतून मिळणाऱ्या महसूलाचा उपयोग राज्यातील पायाभूत सुविधांचा विकास, शिक्षण आणि आरोग्य सुधारणा, महिला व बालविकासाचे मजबुतीकरण तसेच कृषी क्षेत्र आदींसाठी करण्यात येतो, त्याचप्रमाणे लॉटरीची विक्री करणे हा अनेक बेरोजगार तरुणांसाठी पूर्णवेळ किंवा अर्धवेळ व्यवसाय झाला असूनही सदर लॉटरीत सहभागी होता येणार की नाही याबाबत जनतेच्या मनात साशंकता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आजपर्यंत अनेक जनसामान्यांची उद्दिष्टपूर्ती करणारी महाराष्ट्र राज्य लॉटरी पूर्ववत सुरु ठेवण्याचा फेरविचार करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार :**
(१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.
महाराष्ट्र राज्य लॉटरी सद्य:स्थितीत नियमितपणे सुरु आहे.

-----------------

## मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील ट्रॉमा सेंटर सुरु करण्याबाबत

**(२२) * ३२१ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील मनोर जवळील टाकवहाळ येथील ट्रॉमा सेंटर सन २०१८ मध्ये पूर्ण क्षमतेने सुरु होणे अपेक्षित असतानाही अद्यापपावेतो सुरु झाले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ट्रॉमा सेंटरच्या इमारतीचे काम करणाऱ्या ठेकेदाराला दररोज ७० हजार रुपये दंड आकारण्यात येत असून दंडाची रक्कम रुपये ५८ लाखांच्या आसपास झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांशी असलेल्या आर्थिक संगनमतामुळे दंडाची रक्कम ठेकेदाराकडून वसूल करण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ट्रॉमा सेंटरचे काम अन्य ठेकेदाराकडून पूर्ण करण्याबाबत तसेच दंडाची रक्कम ठेकेदाराकडून वसूल करुन ट्रॉमा सेंटरचे काम विहित मुदतीत पूर्ण न करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे आहे.

जागा हस्तांतरणाबाबत व निविदाप्रक्रियेअंती कार्यारंभ आदेश दि.०८/०३/२०१९ रोजी दिला. परंतु कोव्हीड कालावधीत मजुर उपलब्ध नसल्याने व साहित्याचा तुटवडयामुळे मूळ दोन वर्षाच्या मुदतीत काम पूर्ण झाले नाही. अतिरिक्त बाबींमुळे उद्भवलेली सुधारीत प्रशासकीय मान्यता दि.३०/०१/२०२४ रोजी प्राप्त झाली. त्यानंतर निविदाप्रक्रियेअंती अतिरिक्त कामे प्रगतीत असून लवकरच काम पुर्ण करण्याचे नियोजन आहे.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग प्रकल्पात सिन्नर तालुक्यातील २६ गावांची जमीन संपादित करताना झालेल्या अनियमिततेबाबत

**(२३)** * **१४१४ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग (नागपूर-मुंबई शीघ्रसंचार द्रुतगती महामार्ग) प्रकल्पात सिन्नर तालुक्यातील (जि.नाशिक) एकूण २६ गावांची जमीन संपादित करण्यात आली असून, यातील बहुतांश जमिनी शासनाने खरेदी स्वरूपात किंवा कराराने घेतल्या असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जमीन संपादन प्रक्रियेदरम्यान संबंधित सक्षम प्राधिकारी आणि तत्कालीन उपविभागीय अधिकारी यांनी त्यांच्या पदाचा दुरुपयोग करून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत काही सामाजिक संस्था व स्थानिक नागरिकांनी दिनांक १० जानेवारी, २०२२ रोजी विभागीय आयुक्त कार्यालयाकडे तक्रार करुनही अद्यापही कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हाधिकारी, नाशिक आणि उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ, मुंबई यांनी तक्रारदारांना दिलेला चौकशी अहवाल वस्तुस्थितीच्या विपरीत असल्याने त्यांनी दिनांक २८ ऑगस्ट, २०२३ रोजी सविस्तर खुलासा सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लवाद केस क्र. १११/२०२३ मध्ये न्यायालयाने जमीन संपादनासाठी भूधारकांना रक्कम वितरित करण्याचे आदेश दिले असूनही, संबंधित उपविभागीय अधिकाऱ्याने ही रक्कम अद्याप भूधारकांना दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू गैरव्यवहारप्रकरणी दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करुन भूधारकांना जमीन संपादनाची रक्कम मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) सदर जमिनी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी स्वरुपात अथवा भूसंपादन प्रक्रियेनुसार सन २०१७-२०१८ ते सन २०१९-२१ या कालावधीत समृध्दी महामार्गाच्या कामकाजाकरीता संपादित करण्यात आल्या आहेत.
(२) हे खरे नाही.

दिनांक १०.०१.२०२२ च्या प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असून, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या अहवालातील निष्कर्षानुसार जिल्हा भ्रष्टाचार निर्मुलन समिती यांनी सदर अर्ज निकाली काढला आहे.
(३) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे दिनांक ११.०७.२०२३ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, नाशिक यांच्यामार्फत तक्रारदारास सदर प्रकरणी वस्तुस्थिती पाठविण्यात आली. तक्रारदाराने त्यांचे दिनांक २८.०८.२०२३ च्या पत्रान्वये विभागीय आयुक्त तथा विभागीय भ्रष्टाचार निर्मुलन समिती, नाशिक यांच्याकडे खुलासेवार माहिती सादर केली आहे.
(४) व (५) मा.जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक यांच्याकडील आरबिट्रेशन ॲप्लीकेशन नंबर १११/२०२३ मध्ये दिनांक ०६.०४.२०२४ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र महामार्ग सुधारणा अध्यादेश २०१८ मधील १९ (क) (४) नुसार नुकसान भरपाई रक्कम रुपये २,७४,९५,७७२/- सिन्नर येथील न्यायालयात दिनांक २५.०५.२०२४ रोजी जमा केलेली आहे. मा.न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील लष्करी भागातून जाणाऱ्या कालव्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(२४) * ११५४ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील लष्करी भागातून जाणाऱ्या पाटबंधारे विभागाच्या कालव्यामध्ये मोठ्या प्रमाणात कचरा टाकण्यात आल्याने या परिसरातील नागरिकांना आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कालव्यांमध्ये विविध ठिकाणी थर्माकोल, प्लास्टिक, पीओपी च्या वस्तू, घरातील नादुरुस्त टाकाऊ वस्तु व पदार्थ मोठ्या प्रमाणात टाकल्यामुळे जल प्रदूषण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे येथील लष्करी भागातून जाणारा हा कालवा पुणे महानगरपालिकेच्या लष्कर पाणीपुरवठा केंद्रात वळविण्यात आला असून येथेच या पाण्यावर प्रक्रिया करून ते पाणी लष्करी भागात पिण्यासाठी वापरले जाते व उर्वरित पाणी पुढे बारामतीला पाठविले जाते याचा नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कालव्यातील पाण्याचे जल प्रदूषण रोखण्याकरिता तसेच सदर कालव्याची दुरवस्था दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

नवीन मुठा उजवा कालवा हा पुणे शहराच्या मध्यवस्तीतून जातो. कालव्या नजिकचे नागरिक/ रहिवाशी हे कालव्यामध्ये काही प्रमाणात कचरा/ टाकाऊ वस्तू टाकतात. तथापि, यामुळे परिसरातील नागरीकांना आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(२) हे खरे आहे.

कालव्या नजिकचे नागरिक / रहिवाशी हे कालव्यामध्ये कचरा /टाकाऊ वस्तू टाकतात, त्यामुळे जलप्रदुषण होते ही वस्तुस्थिती आहे.
(३) अंशत: खरे आहे.

नवीन मुठा कालवा हा लष्कर पाणीपुरवठा केंद्रात वळविण्यात आला नसून नवीन मुठा कालव्याच्या सा.क्र.१९ कि.मी. येथून निघणाऱ्या उपकालव्याद्वारे गॅरिसन Engineering या लष्करी पाणीपुरवठा केंद्रास पाणी उपलब्ध करून दिले जाते. गॅरिसन Engineering मार्फत लष्कर भागात पिण्यासाठी वापरले जाते नवीन मुठा कालव्याद्वारे पुणे, दौंड, इंदापूर व बारामती या भागातील सिंचनासाठी व पिण्यासाठी कालवा सल्लागार समितीत मंजूरी दिल्याप्रमाणे पाणी देणेत येते.
(४) पुणे शहरातून जाणाऱ्या कालव्यामध्ये परिसरातील नागरिकांमुळे होणारे प्रदुषण रोखणे व कालव्यामधून होणारी पाणी गळती रोखण्यासाठी खडकवासला धरण ते फुरसुंगी पर्यंत बोगद्याद्वारे पाणी नेण्याच्या कामास दि.०५/०९/२०२४ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर महानगरपालिकेने शहरातील कचरा संकलन करण्यासाठी कंत्राट दिलेल्या ठेकेदार कंपन्यांच्या कामात अनियमितता होत असल्याबाबत

**(२५)** * **२१७३ श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर महानगरपालिकेने शहरातील कचरा संकलन करण्यासाठी ए. जी. इनव्हायरो, प्रा.लि. आणि बि.व्ही.जी. इंडिया लि. या दोन ठेकेदार कंपन्यांना शहरातील कचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्याची जबाबदारी दिली असून उक्त दोन्ही कंपन्या कचरा संकलन करण्याच्या कामात निष्काळजीपणा करीत असून संकलित केलेला कचरा उघडयावर जाळत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे परिसरातील कचऱ्याच्या धुरामुळे हवा प्रदुषित होत असून तेथील नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याने श्वसनाचे विकार उद्भवत असल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, उक्त दोन्ही ठेकेदार कंपन्यांविरुद्ध करारानुसार कायदेशीर कारवाई व्हावी या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

नागपूर महानगरपालिका हद्दीतील कचरा संकलन व वाहतूक करण्याकरिता ए.जी.इनव्हायरो प्रा.लि. या एजन्सीसोबत दि.३१.०१.२०२० रोजी व मे.बि.व्ही.जी. इंडिया लि. या एजन्सीसोबत दि.१७.०२.२०२० रोजी करारनामा करण्यात आला आहे.

सदर एजन्सीकडून उघडयावर कचरा जाळत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. तथापि, नागपूर शहरातील नागरिकांद्वारे घरासमोरील झाडांचा पालापाचोळा जाळत असल्याबाबत आढळून आले. त्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.

कचरा संकलन व वाहतूक करणाऱ्या दोन्ही एजन्सीजबाबत VTMS (Vehicle Tracking Monitoring System) प्रणालीच्या अनुषंगाने प्राप्त अहवालानुसार दोन्ही एजन्सीद्वारे Route Coverage पूर्ण होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुषंगाने सदर एजन्सींवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) नागपूर महानगरपालिकेने दोन्ही एजन्सींना करारनाम्यातील समाविष्ट असलेल्या स्वच्छता मानकांची पूर्तता न केल्यामुळे एकूण रु. १३,६७,३६,१९२/- इतका दंड आकारला आहे. कचरा संकलनाकरिता वाहनांची संख्या वाढविण्याकरिता दोन्ही एजन्सीना महानगरपालिकेद्वारे नोटीस बजावण्यात आली आहे. एजन्सींच्या कामावर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी VTMS (Vehicle Tracking Monitoring System) प्रणाली विकसित करण्यात आली आहे.

तसेच दोन्ही एजन्सींच्या कामात सुधारणा न झाल्यामुळे करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार महानगरपालिकेमार्फत त्यांना दि. ०१.१०.२०२४ Preliminary Termination Notice बजावण्यात आली आहे. त्याअनुषंगाने एजन्सींमार्फत Proposal to rectify सादर केल्यामुळे कामात सुधारणा करण्याकरिता नोव्हेंबर, २०२४ मध्ये एजन्सींना ९० दिवसांचा कालावधी देण्यात आला. एजन्सींच्या कामाचे मूल्यमापन करण्याची कार्यवाही नागपूर महानगरपालिकेच्या स्तरावर सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.